| | |
|---|---|
| MHNS170001782024 | व्यंकटेश गजानन जोशी<br>वि.<br>लक्ष्मण वामन जोशी |

## आदेश निशाणी २३

## नियमित दिवाणी दावा क्र.१७/२०२४

१.  सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ तर्फे कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ होवून मिळण्याकरीता दाखल केले आहेत.

२.  प्रस्तुत अर्जांवर वादी तर्फे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जातील कारण कायदेशीर नाही. करीता, अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

३.  प्रस्तुत दाव्याचे व अर्जांचे अवलोकन करता, सदरचा दावा निरंतर ताकीद मनाई हुकूमाचा विकल्पाने वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. २ हे दि.०६.०४.२०२४ रोजी त्यांचे विधीज्ञांमार्फत दाव्यात हजर झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र.२ हे वयस्कर असल्याने व त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांना वेळेत दाव्यास कैफियत/जबाब दाखल करता आला नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन करता, दि.१७/०८/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ चे विरुध्द दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश पारित झाल्याचे दिसते. परंतु नमूद अर्जातील कारणांचा विचार करता व दावा गुणवत्तेवर सुनावणीकरीता प्रतिवादी क्र.२ यांस कैफियत/जबाब दाखल करण्याची संधी दिल्यास वादी व दाव्यावर त्याचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे दिसते. याउलट, दावा गुणदोषावर चालविण्यास मदतच होईल. करीता, प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या उशिरास योग्य त्या खर्चाची रक्कम लावून मंजूर करणे योग्य वाटते. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो.

# आ दे श

१. निशाणी २३ वरील अर्ज खर्च रु.१५०/- (अक्षरी रु एकशे पन्नास मात्र) वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वरील आदेशाची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांनी अभिलेखावर दाखल असलेली कैफियत स्विकारण्यात येते.

JAGDISH MADHAV AGNIHOTRI

Digitally signed by JAGDISH MADHAV AGNIHOTRI
Date: 2024.12.10 15:27:41 +0530

(जगदीश एम. अग्नीहोत्री)

नांदगांव. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदगांव.

दि.१०/१२/२०२४ ता.नांदगांव, जि.नाशिक.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS